# FIRST INFORMATION REPORT

**Form : 1-A**

पहिली खबर

(Under Section 154 Cr. P.C.)

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)

**No.** 0039004

1. * Dist. / जिल्हा: भंडारा  * P.S. / पोलीस ठाणे: तुमसर  *Year / वर्ष: २०१९  *FIR No. / पहिली खबर क्र.: २८/१९  *Date / तारीख: १५/०९/२०१९

2. (i) *Act / अधिनियम: ला.प्र.का. (सुधारित) अधिनियम २०१८  *Sections / कलमे: ७ (२)

(ii) *Act / अधिनियम: —  *Sections / कलमे: —

(iii) *Act / अधिनियम: —  *Sections / कलमे: —

(iv) *Other Acts & Sections / इतर अधिनियम व कलमे:

3.(a) *Occurence of Offence : / अपराधाची घटना  *Day / वार: मंगळवार  *Date from / तारीख पासून: १५/०९/२०१९  *Date To / तारीख पर्यंत: १५/०९/२०१९ १६.३० वा.

*Time Period / वेळेचा अवधी: दुपारनंतर  *Time From / पासून: १२.३०  *Time To / पर्यंत: १६.१६ वा.

(b) Information received at P.S.Date / पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख: १५/०९/२०१९  *Time / वेळ: २०.४० वा.

(c) General Diary Reference Entry No. (s) / सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्रमांक: SD NO/ ४९/२०१९  *Time / वेळ: २०.५३

4. Type of information : / माहितीचा प्रकार: लाच व भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्याने  *Written / Oral : / लेखी/तोंडी: लेखी

5. Place of Occurrence : / घटनेचे ठिकाण (a) * Direction and Distance from P.S. / पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर: दक्षिणेस १ कि.मी.  Beat No. / गस्तक्षेत्र क्र.:

(b) *Address: / पत्ता: उप-कोषागार कार्यालय, तुमसरचे. उप-कोषागार अधिकारी यांचे कक्षामधील

(c) *In case outside limit of this Police Station, then the / या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नाव

Name of P.S. / पोलीस ठाणे:  Dist.: / जिल्हा:

6. Complainant /Informant : / तक्रारदार / खबरी

(a) Name / नाव: योगेश्वर पारधी

(b) Father's/ Husband's Name / पित्याचे / पतीचे नाव: विठोबा पारधी

(c) Date/Year of Birth : / जन्म तारीख / वर्ष: ४५ वर्ष  (d) Nationality : / राष्ट्रीयत्व: भारतीय

(e) Passport No. : / पारपत्र क्र.:  Date of Issue : / दिल्याची तारीख:  Place of Issue / दिल्याचे ठिकाण:

(f) Occupation : / व्यवसाय: पोलीस निरीक्षक

(g) Address : / पत्ता: लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा.

# फिर्याद

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा
कॅम्पः—पो.स्टे. तुमसर.
दिनांकः—१५/०१/२०१९.

मी योगेश्वर विठोबा पारधी, वय ३५ वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा कॅम्प—पो.स्टे. तुमसर शासनातर्फे फिर्याद देतो की, आम्ही दि. १५/०१/२०१९ रोजी १२.३० वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे हजर असता तक्रारदार श्री. शैलेश युवराज मानमोडे, वय ३८ वर्षे धंदा—नौकरी, औषध निर्माण अधिकारी, उप—जिल्हा रूग्णालय, तुमसर रा. बावनथळी कॉलनी, तुमसर ता. तुमसर जिल्हा—भंडारा, यांनी त्यांचे भाषेत लेखी तक्रार नोंदविली ती खालीलप्रमाणे आहे.

''मी ॲन्टी करप्शन ब्युरो, भंडारा येथे समक्ष हजर येवून लेखी तक्रार नोंदवितो की, मी वरील पत्यावर राहतो उप—जिल्हा रूग्णालय, तुमसर येथे औषध निर्माण अधिकरी या पदावर कार्यरत आहे.

उप—जिल्हा रूग्णालय, तुमसर येथे औषध निर्माण अधिकरी या पदावर मी सन—२०१७ पासुन कार्यरत असुन माझे कडे औषधाचे पुरवठा तसेच बाहेरील विकत घेत असलेल्या औषधाचे बिल संबधित रजिष्टर्ड औषधी पुरवठादार यांचे कडील बिल घेवुन ते प्रमाणित करून सदर बिले कोषागार कार्यालयात सादर करून त्यांची देयके त्यांना देण्याची कामे करीत असतो.

उप—कोषागार कार्यालय, तुमसर येथे आठ रजिष्टर्ड औषधी पुरवठा धारकाचे औषधाचे बिले दिनांक १०/०१/२०१९ रोजी अनुक्रमे २१,९६३/—रूपये, ३७४०/—रूपये, १२४६/—रूपये, २०७५/—रूपये, ६६७७/—रूपये ९६०८/—रूपये, १००००/—रूपये, व १२,०२/— रूपये असे एकुण ५६,५११/— रूपयाचे देयके सादर केले होते. मी सादर केलेल्या औषधांचे बिल मंजुर करण्याकरीता तेथिल कर्मचारी अशोक लेंडे, उप—कोषागार अधिकारी व श्री. संजय श्रीपाद, लेखालिपीक, उप—कोषागार कार्यालय, तुमसर यांना जावुन बिल मंजुर करण्याबाबत भेटलो असता त्यांनी मला औषधांची बिले मंजुर करण्याकरीता १०००/— रूपयाची मागणी केली आहे. मी जर पैसे दिले नाहीतर मी सादर केलेले औषधांची बिले लवकर मंजुर होणार नाही असे म्हणुन श्री अशोक लेंडे, उप—कोषागार अधिकारी व श्री. संजय श्रीपाद, लेखालिपीक, उप—कोषागार कार्यालय, तुमसर जि. भंडारा या दोघांनी मला १०००/— रूपये लाचेची मागणी केली आहे.

सदर कायदेशिर कामाकरिता श्री. अशोक लेंडे, उप—कोषागार अधिकारी व श्री. संजय श्रीपाद, लेखालिपीक, उप—कोषागार कार्यालय, तुमसर यांनी मला मी सादर केलेल्या औषधांची बिले मंजुर करण्याकरीता मागणी केलेली लाच रक्कम १०००/— रूपये देण्याची माझी मुळीच इच्छा नसल्याने त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता त्यांनी मागणी केलेले लाच रक्कम एक हजार रुपये सोबत आणले आहे. त्यांचेशी पुर्वीचे माझे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही. तरी त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. अशी लेखी तक्रार नोंदविली.

त्यानंतर लाचेच्या संबंधाने सापळा पडताळणी व सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी दोन शासकीय पंचाना बोलावून पंच म्हणून हजर राहण्याबाबत लेखी समंती घेण्यात आली. त्यानंतर तक्रारदार यांनी दोन्ही गैरअर्जदाराविरूध्द लाचे करिता आनलेले १०००/— रूपये समक्ष पेश केले. त्यानंतर तक्रारी व पंचासमक्ष आमचे कार्यालयातील कर्मचारी यांचे हस्ते प्रात्यक्षिक पंचनामा क्र.१,

**Form : 1-B**

7. Details of known/ suspected/ unknown accused with full particulars :
माहित असलेल्या/ संशयीत/ माहित नसलेल्या आरोपीचा संपूर्ण तपशील :
(Attach separate sheet, if necessary)
(आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा)

**No. 0039004**

आरोपी क्र.१ : अशोक केशवराव लोंढे, वय-५३ वर्षे, पद-उपकोषागार अधिकारी, उपकोषागार कार्यालय, तुमसर जि. भंडारा रा. गुरुनानक वार्ड, शास्त्रीनगर, भंडारा
आरोपी क्र.२ : संजय नरेंद्र श्रीपाद वय-३८ वर्षे, पद लेखालिपिक उपकोषागार कार्यालय तुमसर रा. सुभाष वार्ड, मोहाडी ता. मोहाडी जि. भंडारा

Physical features, deformities and other details of the suspect :
संशयितांची शारीरिक ठेवण, व्यंग आणि इतर तपशील :

| *Sex लिंग | *Date/Year of Birth जन्मतारीख/ वर्ष | *Build बांधा | *Height in Cms. उंची (सें. मी. मध्ये) | *Complexion वर्ण | *Identification Mark(s) ओळख |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| | | | — | | |

| *Deformities/Peculiarities व्यंग / वैशिष्ट्ये | *Teeth दात | *Hair केस | *Eye डोळे | *Habit(s) सवयी | *Dress Habits पोशाखाच्या सवयी |
|---|---|---|---|---|---|
| (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) |
| | | — | | | |

| * Languages/Dialect भाषा / बोली भाषा | PLACE OF | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | *Burn Mark भाजल्याची खूण | *Leucoderma कोड | *Mole तीळ | *Scar व्रण | *Tattoo गोंदण |
| (13) | (14) | (15) | (16) | (17) | (18) |
| | — | | | | |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect. This will be used only for the purpose of preliminary retrieval to assist I. O.
जर तक्रारदार/ खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावी. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी.
A database created will subsequently link one suspect in several cases, if any.
या अनुषंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीताचा इतर गुन्ह्यातील सहभाग स्पष्ट करेल.
A comprehensive and complete data on all fields will again be prepared when any accused is arrested irrespective of previous suspicion.
वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयीतास अटक करण्यात येईल त्यावेळी पुनःश्च तयार करावी.

दिनांक १५/०१/२०१९ अन्वये तयार करण्यात आला. तक्रारी,पंचाना योग्य सुचना देण्यात आल्या. त्याची नोंद पंचनामा क्रं. १ मध्ये घेण्यात आली.

त्यानंतर दोन्ही गै.अ. श्री. अशोक लेंडे, उप—कोषागार अधिकारी व श्री. संजय श्रीपाद, लेखालिपीक, उप—कोषागार कार्यालय, तुमसर जि. भंडारा यांनी तक्रारदाराला खरच लाचेची मागणी केली किंवा कसे याबाबत प्रत्यक्ष गै.अ. यांना भेटून लाचेच्या मागणी बाबत पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही पडताळणी व सापळा कार्यवाही करीता लागणारे संपुर्ण साहीत्य आमचे कार्यालयातील कर्मचारी यांचे हस्ते चारचाकी शासकिय वाहणामध्ये सोबत ठेवण्यास सांगतिले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार यांनी सांगितले प्रमाणे कृषी उत्पनन बाजार समिती तुमसर अलीकडील शेतशिवारामध्ये तक्रारदार यांना त्यांचे कडील दुचाकी वाहनाने रवाना करून त्यांचे मागोमाग चारचाकी शासकिय वाहनाने आम्ही, दोन्ही पंच व सापळा कार्यवाहीतील सदस्यासह वेळ १४.०५ वाजता आमचे कार्यालयातुन रवाना होवुन कृषी उत्पनन बाजार समिती तुमसर अलीकडील शेतशिवारात जावुन थांबलो.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. १ यांना दोन्ही गै.अ. श्री. अशोक लेंडे, उप—कोषागार अधिकारी व श्री. संजय श्रीपाद, लेखालिपीक, उप—कोषागार कार्यालय, तुमसर यांचे कडे त्यांचे उप—कोषगार अधिकारी कार्यालय, तुमसर येथे लाचेच्या मागणी बाबत पडताळणी करण्याकरीता वेळ १४.५९ वा. पाठविण्यात आले. त्यानंतर तक्रारी व पंच क्रं. १ हे आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी १५.३२ वाजता परत आले. तक्रारदार व पंच क्र. १ यांना पडताळणी दरम्यान दिलेल्या माहीतीवरून व रेकॉर्ड झालेल्या संभाषनावरून दोन्ही गै.अ. श्री. अशोक लेंडे, उप—कोषागार अधिकारी व श्री. संजय श्रीपाद, लेखालिपीक, उप—कोषागार कार्यालय, तुमसर यांनी संगणमत करून तक्रारदार यांना **<u>"त्यांनी आठ रजिष्टर्ड औषधी पुरवठादार यांचे कडुन खरेदी केलेल्या औषधांची बिले ती प्रमाणित करून कोषागार कार्यालयात सादर केलेली बिले मंजुर करण्याकरीता दोन्ही गैरअर्जदार यांनी संगणमत करून १०००/— रुपयाची लाचेची मागणी करुन लाच रक्कम आपले कार्यालयातच काही वेळाने स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे प्रथम दर्शनी दिसून आली."</u>**

त्यानंतर आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणावरून सापळा कार्यवाही आयोजित करण्यात आली. सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदाराकडे नमुद लाच रक्कम, चालु स्थितीत व्हाईस रेकॉर्डर व पंच क्रं.१ यांचे सह श्री. अशोक लेंडे, उप—कोषागार अधिकारी व श्री. संजय श्रीपाद, लेखालिपीक, उप—कोषागार कार्यालय, तुमसर यांचे कडे लाच रक्कम घेवुन वेळ १६.०२ वाजता उप—कोषागार कार्यालय, तुमसर येथे पाठविण्यात आले. त्यानंतर आम्ही, पंच क्र. २ तसेच सापळा पार्टीतील सदस्य असे मिळून आमचे शासकीय वाहनांनी त्यांचे मागो—माग येवून उप—कोषागार कार्यालय, तुमसर च्या समोर आजुबाजुला संशय येणार नाही अशा पध्दतीने आपले अस्तीत्व लपवून नियोजित ईशाऱ्याची वाट पाहत दबा धरून थांबलो.

वेळ १६.१७ वाजता तक्रारी यांनी आम्ही दिलेल्या सूचना प्रमाणे आम्हास दोन्ही गै.अ. श्री. अशोक लेंडे, उप—कोषागार अधिकारी व श्री. संजय श्रीपाद, लेखालिपीक, उप—कोषागार कार्यालय, तुमसर यांनी लाच रक्कम स्वीकारल्याचा नियोजीत इशारा केला. तेव्हा आम्ही पंच क्र. २ व सापळा पार्टीतील सर्व सदस्य घटना स्थळावर पोहचलो. तेथे आरोपी हे उप—कोषागार अधिकारी चे कक्षामध्ये हजर होते. त्यावेळी तक्रारी यांनी तेथिल कक्षामध्ये खुर्चीवर बसलेल्या इसमाकडे बोट दाखवून हेच ते श्री अशोक लेंडे असल्याचे सांगुन लाच रक्कम त्यांनी आपले उजवे हातांनी स्वीकारुन आपले अंगातील शर्ट च्या समोरील डावे बाजुचे खिशात ठेवले असल्याचे आम्हास सांगितले. तसेच लाचेची मागणी करणारे दुसरे गै.अ. श्री. संजय श्रीपाद हे लगतच्या कक्षामध्ये बसले असल्याचे सांगितले.

**Form : 1-C**

8. Reasons for delay in reporting by the Complainant/Informant :
तक्रारदाराने/ खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे : **No.** 0039004

—

9. Particulars of properties stolen/involved (Attach separate sheet, if necessary) :
चोरीस गेलेल्या/ अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा) :

—

10. *Total value of properties stolen/involved : लाच रक्कम - 9000/- रुपये
चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

11. *Inquest Report/U. D. Case No., if any :
मरणान्वेषण अहवाल/ यु. डी. प्रकरण क्र. जर असल्यास :

12. F. I. R. Contents (Attach separate sheets, if required ): प्रकरण असे आहे की नमूद ता. वेळी आणि ठिकाणी
पहिल्या खबरीतील हकिगत (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावेत) : यातील नमूद दोन्ही आरोपी यांनी संगनमत करून तक्रारदार [illegible] मानमोडे यांना त्यांनी ग्राम रजिस्टर्ड औषधी पुरवठादार यांचे कडून खरेदी केलेल्या औषधांची बिले ती प्रमाणित करून कोषागार कार्यालयात सादर केलेली बिले मंजूर करण्याकरिता पडताळणी कार्यवाही वेळी नमूद दोन्ही आरोपी यांनी तक्रारदार यांना 9000/- रु. ची. लाचेची मागणी करून प्रत्यक्ष सापळा कार्यवाही वेळी लोकसेवकाशी प्रकारच्या प्रतिकार न करता आरोपी क्र. 1 यांनी लाच रक्कम स्विकारल्याने नमूद दोन्ही आरोपीविरुद्ध सदरच्या कलमान्वये गुन्हा नोंद करून तपासात [illegible].

13. Action taken : Since the above report reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2, registered the case and took up the investigation/directed*.......................
.......................Rank.......................to take up the investigation/
Refused investigation/transferred to P. S.......................on point of jurisdiction.
केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरुन दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले श्री. [illegible] निवास पारधी
पदनाम पोलीस निरीक्षक ............... यांना तपासाचे काम हाती घेण्याचा निर्देश दिला/ तपास करण्याचे नाकारले/अधिकारितेच्या मुद्यावर लाप्रवि. भंडारा ....................... पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.

F. I. R. read over to the Complainant/Informant /admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/Informant free of cost.
पहिली खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदवली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला प्रत मोफत दिली.

14. Signature/Thumb impression of the Complainant/Informant.
तक्रदाराची/खबरीची सही/अंगठ्याचा ठसा

Signature of the Officer in-charge, Police Station
पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सही

*Name : रितेंद्र ध्यानीराम बर्वे
नाव

*Rank : पोलीस नायक No. 1154
पदनाम क्रमांक

15. Date & Time of despatch to the court : दि. 28/07/2019 पो. स्टे. तुमसर
कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ

आम्ही लाच रक्कम स्वीकारणा—या पहिल्या इसमास आपले ओळखपत्र दाखवुन त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव अशोक केशवराव लेंडे, वय— ५३ वर्षे, पद— उप—कोषागार अधिकारी, वर्ग—३ उप—कोषगार कार्यालय, बजाज नगर, तुमसर जिल्हा भंडारा रा. गुरूनानक वार्ड, शास्त्रीनगर, भंडारा जिल्हा—भंडारा असे सांगितले. ते नोंद करण्यात आले.

त्यानंतर आम्ही लाचेची मागणी करणारे दुस—या इसमास आपले ओळखपत्र दाखवुन त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव संजय नरेंद्र श्रीपाद, वय— ३६ वर्षे, पद— लेखालिपीक, वर्ग—३ उप—कोषगार कार्यालय बजाज नगर, तुमसर जिल्हा भंडारा रा. सुभाष वार्ड, मोहाडी ता. मोहाडी जिल्हा—भंडारा असे सांगितले. ते नोंद करण्यात आले.

त्यानंतर सदरचे घटनास्थळावरती सविस्तर कार्यवाही प्रमाणे कार्यवाही करून लाच रक्कम आरोपी क्रं. १ श्री. अशोक लेंडे यांचे कडुन जप्तीप्रत्रका प्रमाणे जप्त करण्यात आले. त्यानंतर तक्रारदार यांनी सादर केलेली आठही बिले यांची कार्बन प्रत (झेरॉक्स प्रत) काढुण आरोपी क्रं. २ श्री. संजय श्रीपाद यांचे कडुन जप्तीप्रत्रका प्रमाणे जप्त करण्यात आले.

त्यानंतर सदर घटनास्थळ हे उप—कोषागार कार्यालय, बजाज नगर तुमसर येथिल असुन लोकांचे वरर्दळीचे ठिकाणातील असल्याने व लोकांची गर्दी होत असल्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने आरोपीला ताब्यात घेवून पुढील कारवाई पोलीस स्टेशन, तुमसर येथे करण्यात आली.

पोलीस स्टेशन, तुमसर येथे आरोपी क्रं. १ श्री. अशोक केशवराव लेंडे, यांचे शर्टाची पर्यायी व्यवस्था झाल्याने त्यांचे अंगातिल सदर शर्ट लाच रक्कमेच्या संपर्कात आल्याने गुन्हयाचे तपासात काही वेळाने पो.स्टे. तुमसर येथे वेगळया जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करुन ताब्यात घेण्यात येत आहे. आज दिनांक १५/०१/२०१९ रोजी झालेल्या कार्यवाहीचा पडताळणी व सापळा पंचनामा क्रं. २ तयार करण्यात आलेला असुन त्यामध्ये सविस्तर नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

एंकदरीत आरोपी क्रं. १ श्री. अशोक केशवराव लेंडे, वय— ५३ वर्षे, पद— उप—कोषागार अधिकारी, वर्ग—३ उप—कोषगार कार्यालय, बजाज नगर, तुमसर जिल्हा भंडारा रा. गुरूनानक वार्ड, शास्त्रीनगर, भंडारा जिल्हा—भंडारा व आरोपी क्रं. २ श्री. संजय नरेंद्र श्रीपाद, वय— ३६ वर्षे, पद— लेखालिपीक, वर्ग—३ उप—कोषगार कार्यालय बजाज नगर, तुमसर जिल्हा भंडारा रा. सुभाष वार्ड, मोहाडी ता. मोहाडी जिल्हा—भंडारा यांनी लोकसेवक पदाचा गैरवापर करून शासकिय काम अप्रामाणिकपणे करण्याचे उद्देशाने दोन्ही आरोपी यांनी संगणमत करून यातील तक्रारदार श्री शैलेश युवराज मानमोडे, वय ३८ वर्षे धंदा—नौकरी, औषध निर्माण अधिकारी, उप—जिल्हा रूग्णालय, तुमसर रा. बावनथळी कॉलनी, तुमसर ता. तुमसर जिल्हा—भंडारा यांना <u>**''त्यांनी आठ रजिष्टर्ड औषधी पुरवठादार यांचे कडुन खरेदी केलेल्या औषधांची बिले ती प्रमाणित करून कोषागार कार्यालयात सादर केलेली बिले मंजुर करण्याकरीता दोन्ही आरोपी यांनी संगणमत करून १०००/— रुपयाची लाचेची मागणी करुन''**</u> ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवुन प्रत्यक्ष सापळा कार्यवाही वेळी लाच रक्कम १,०००/— रुपये आरोपी क्रं. १ श्री. अशोक केशवराव लेंडे यांनी स्वीकारली आहे. सदर दोन्ही आरोपींचे कृत्य कलम ७, (a) लाचलुचपत प्रतिबंध कायदा (सुधारीत) अधिनियम २०१८ अन्वये गुन्हा होत असल्याने दोन्ही आरोपी विरूध्द सदर कलमान्वये गुन्हा नोंद होणेस माझी शासनातर्फे त्यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

(योगेश्वर पारधी)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा.
कॅम्पः—पो. स्टे. तुमसर.